# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.09.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान आजपासून ईशान्येकडील राज्यांच्या दौऱ्यावर
2. देशाचे 15 वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांचा शपथविधी
3. यूपीआयद्वारे व्यक्ती ते व्यापारी व्यवहारांसाठीच्या मर्यादेत वाढ
4. नेपाळमधल्या हंगामी सरकारच्या पंतप्रधानपदी माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांची नियुक्ती आणि
5. फिडे ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेतल्या सामन्यात विश्वविजेता डी. गुकेशला महिला विश्वविजेती दिव्या देशमुखनं बरोबरीत रोखलं

**पंतप्रधान-ईशान्य दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मिझोराम, मणिपूर आणि आसाम या ईशान्य भागातील राज्यांना भेट देणार आहेत. मिझोराममधील ऐझवाल इथं आज सकाळी पंतप्रधानांच्या हस्ते विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन तसंच भूमीपूजन समारंभ होणार आहे. यामध्ये बैरावी साईरंग रेल्वेमार्गावरील पुलाच्या उद्घाटनाचा समावेश आहे. या पुलामुळे मिझोरामची राजधानी ऐझवाल पहिल्यांदाच रेल्वेमार्गाच्या नकाशावर येणार असून ही ऐतिहासीक घटना असल्याची प्रतिक्रिया रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केली आहे.

मिझोरामनंतर पंतप्रधान मणिपूरला रवाना होणार आहेत. तिथे ते विविध विकास प्रकल्पांचं भूमीपूजन करतील. काही विकास प्रकल्पांचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. यामध्ये चूरचंडपूर आणि इंफाळ इथल्या विकास प्रकल्पांचा समावेश आहे. या दोन्ही शहरांत पंतप्रधानांची जाहीर सभा होणार आहे. आपल्या आसाम भेटीत पंतप्रधान गुवाहाटी इथल्या भारतरत्न डॉक्टर भूपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दी सोहोळ्यात सहभागी होतील. उद्या पंतप्रधानांच्या हस्ते आसाममधल्या काही पायाभूत सुविधा आणि औद्योगिक प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन होणार आहे. परवा सोमवारी पंतप्रधान पश्चिम बंगालला भेट देणार आहेत. कोलकता इथं होणाऱ्या 16 व्या संयुक्त कमांडर परिषदेचं उद्घाटन मोदी यांच्या हस्ते होईल. बिहारमधल्या पूर्णिया विमानतळाच्या नवीन इमारतीचं तसंच राष्ट्रीय मखाना मंडळाचं उद्घाटन पंतप्रधान करणार आहेत.

**ज्ञान भारतम पोर्टल**

'भारतामध्ये हस्तलिखितांचा मोठा खजिना आहे; 'ज्ञान भारतम' मिशनच्या माध्यमातून हा वारसा जगासमोर खुला करण्यात येत आहे'; असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. 'भारताच्या ज्ञानपरंपरेचा हस्तलिखित

वारशाच्या माध्यमातून शोध' या संकल्पनेवर आधारित परिषदेत; 'ज्ञान भारतम' या डिजिटल पोर्टलचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी बोलताना पंतप्रधान म्हणाले....

**ज्ञान भारतम् मिशन भारत के संस्कृति, साहित्य और चेतना का उद्घोष बनने जा रहा है। हजारों पीढ़िया का चिंतन मनन भारत के महान ऋषियों, आचार्यों और विद्वानों का बोध और स्रोत, हमारे ज्ञान परंपराएं, हमारे वैज्ञानिक धरोहरें ज्ञान भारतम् मिशन के जरिए हम उन्हें डिजिटाइज करने जा रहे हैं। मैं इस मिशन के लिए सभी देशवासियों को बधाई देता हूं।**

**उपराष्ट्रपती शपथविधी**

सी. पी. राधाकृष्णन यांनी भारताचे पंधरावे उपराष्ट्रपती म्हणून काल शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. राष्ट्रपती भवनात झालेल्या या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्यासह केंद्रीय मंत्री, राज्यांचे मंत्री आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपराष्ट्रपतीपदाची शपथ घेतल्यानंतर राधाकृष्णन यांनी महात्मा गांधी तसंच अटलबिहारी वाजपेयी यांच्या समाधीस्थळी जाऊन त्यांना आदरांजली अर्पण केली.

**यूपीआय मर्यादा**

यूपीआय व्यवहारांसाठीच्या मर्यादेत भारतीय राष्ट्रीय देयक महामंडळानं मोठी सुधारणा जाहीर केली आहे. आता व्यक्ती ते व्यापारी अशा व्यवहारांमध्ये निवडक श्रेणीतील उत्पादनांसाठी नागरिक दिवसाला दहा लाख रुपयांपर्यंतचे व्यवहार करू शकतील. येत्या सोमवारपासून हा निर्णय अमलात येणार आहे. भारतीय नागरिकांसाठी मोठ्या रकमेचे डिजिटल व्यवहार करणं अधिक सोपं आणि सुरक्षित असेल यादृष्टीनं नव्या यूपीआय नियमांची आखणी करण्यात आल्याचं महामंडळानं आपल्या परिपत्रकात म्हटलं आहे. दरम्यान, दोन व्यक्तींमधल्या आर्थिक व्यवहाराची 1 लाख रुपयांची मर्यादा कायम ठेवण्यात आली आहे.

**नवी मुंबई विमानतळ**

नवी मुंबई विमानतळाचं उद्घाटन येत्या 30 सप्टेंबर रोजी होणार असून नोव्हेंबर महिन्यात प्रत्यक्ष उड्डाणांना सुरुवात होण्याची अपेक्षा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि बहुस्तरीय दळणवळण सेवा असलेलं हे देशातलं सर्वात मोठं विमानतळ आहे. या विमानतळावरुन मुंबईसह राज्यातल्या इतर भागात जाण्यासाठी सुलभ वाहतूक सुविधा असेल अशी माहिती सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी दिली. रस्ते वाहतूक, रेल्वे, मेट्रो आणि बस अशा सर्व प्रकारच्या वाहतूक व्यवस्थांशी हे विमानतळ जोडलं जाणार आहे.

**गोयल**

भारत युरोपकडे एक विश्वासू भागीदार, धोरणात्मक सहकारी आणि मित्र म्हणून पाहतो. या सहकार्यातून सर्वसमावेशक विकास, शाश्वतता, कायद्यांचं पालन आणि योग्य आचरणाची अपेक्षा आहे असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. भारत आणि युरोपियन संघ यांच्यातील मुक्त व्यापर कराराविषयीच्या संयुक्त मंत्रीस्तरीय चर्चासत्रात ते काल नवी दिल्लीत बोलत होते. या भागीदारीकडे व्यापार विस्ताराबरोबरच जगातल्या

सकारात्मक वातावरणनिर्मितीच्या दृष्टीनेही पाहायला हवं. भारत आणि युरोपिय संघ एकमेकाला पूरक आहेत, परस्परांचे स्पर्धक नाहीत असं गोयल यावेळी म्हणाले.

**नेपाळ**

नेपाळमधल्या हंगामी सरकारच्या पंतप्रधान म्हणून माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काल राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्या नेपाळच्या पहिल्या महिला पंतप्रधान आहेत. नेपाळमधल्या हिंसक आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गेले तीन दिवस झालेल्या सविस्तर चर्चेनंतर हंगामी सरकार स्थापन करण्याचा आणि कार्की यांची पंतप्रधान म्हणून नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, नवनियुक्त हंगामी पंतप्रधान कार्की यांच्या शिफारसीवरुन राष्ट्रपती पौडेल यांनी लोकसभा बरखास्त केली असून पुढच्या वर्षी 5 मार्च रोजी निवडणूक घेण्यात येईल अशी घोषणा केली. नेपाळमधल्या हंगामी सरकार स्थापनेच्या निर्णयाचं आणि सुशीला कार्की यांच्या पंतप्रधानपदी निवडीचं भारतानं स्वागत केलं आहे. या निर्णयामुळे नेपाळमध्ये शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित होण्यात मदत होईल अशी अपेक्षा परराष्ट्र मंत्रालयानं व्यक्त केली आहे. दोन्ही देशांच्या नागरिकांच्या हितासाठी भारत नेपाळसोबत काम करत राहील असं परराष्ट्र मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**न्यूयॉर्क जाहीरनामा**

संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेत भारतानं न्यूयॉर्क जाहीरनाम्याला पाठिंबा दर्शवला आहे. पॅलेस्टाइनचा प्रश्न शांततेच्या मार्गानं सोडवणं आणि दोन देशांच्या पर्यायाची अंमलबजावणी याबाबतचा हा जाहीरनामा आहे. हा जाहीरनामा स्वीकारण्याबाबत फ्रान्सनं मांडलेल्या ठरावाच्या बाजूनं 142 देशांनी मत दिलं. इस्राइल आणि अमेरिकेसह 10 देशांनी या ठरावाला विरोध केला.

**ट्रम्प**

रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे भारतावर अतिरिक्त आयात कर लादण्याचा निर्णय घेणं सोपं नव्हतं अशी कबुली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. सध्या सुरू असलेल्या वाटाघाटींच्या फलनिष्पत्तीबाबत आपण आशावादी असल्याचंही त्यांनी सांगितलं. एका खाजगी दूरचित्रवाणी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. भारतावर 50 टक्के आयात कर लादणं अमेरिकेसाठीही खूप मोठी गोष्ट होती असं ट्रम्प म्हणाले. रशियाच्या युक्रेनसोबत अद्यापही सुरू असलेल्या संघर्षाबाबत काय कारवाई करणार या प्रश्नाच्या उत्तरादाखल त्यांनी आपली भूमिका मांडली.

**निवडणुका**

बांगलादेशातील राजकीय पक्षांमध्ये आगामी निवडणुकांवरून वाढत असलेल्या मतभेदाच्या पार्श्वभूमीवर आता पुढच्या वर्षी 15 फेब्रुवारी 2026 पर्यंत मतदान होईल, अशी घोषणा सध्याच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार शफीक उल आलम यांनी काल केली. मागुरा जिल्ह्यातील श्रीपूर इथं ते पत्रकारांशी बोलत होते. अंतरिम सरकारने ठरवलेल्या वेळापत्रकानुसारच निवडणुका होतील. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया विस्कळीत करण्याचा कोणताही प्रयत्न करू नये, असा इशारा आलम यांनी दिला. निवडणूक पुढे ढकलण्याची कोणतीही शक्यता नाही. ही निवडणूक केवळ

प्रशासनाचं भविष्यच ठरवणार नाही तर त्यानंतरच्या निवडणुका आणि बांगलादेशच्या एकूण राजकीय व्यवस्थेचा पाया रचेल, असंही ते म्हणाले. बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनीही गेल्या आठवड्यात फेब्रुवारी 2026 च्या सार्वत्रिक निवडणुका वेळापत्रकानुसारच झाल्या पाहिजेत, असं म्हटलं होतं.

**ॲथलेटिक्स**

विसावी जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा आजपासून जपानमधील टोकियो इथं सुरू होत आहे. 18 तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत अनेक क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. भारतीय संघाचं नेतृत्व स्टार भालाफेकपटू आणि दुहेरी ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्रा करणार आहे. 14 पुरुष आणि पाच महिलांचा समावेश असलेला भारतीय संघ 15 स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहे. भारत आज पुरुष आणि महिलांच्या 35 किलोमीटर चालण्याच्या स्पर्धेपासून आपली मोहीम सुरू करेल. रामबाबू आणि संदीप कुमार पुरुषांच्या 35 किलोमीटर चालण्यामध्ये भाग घेतील तर प्रियंका गोस्वामी महिलांच्या स्पर्धेत भाग घेईल.

**बुद्धिबळ**

समरकंद इथं सुरू असलेल्या फिडे ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत काल भारतीय स्टार ग्रँडमास्टर आणि विश्वविजेता गुकेश डोममाराजूला भारतीय महिला विश्वविजेती खेळाडू दिव्या देशमुखनं बरोबरीत रोखलं. काळ्या सोंगट्या घेऊन खेळणाऱ्या दिव्याने गुकेशला कधीही आघाडी मिळू दिली नाही. 103 चालींसह सहा तासांच्या मॅरेथॉन खेळानंतर दिव्यानं गुकेशला बरोबरीत रोखण्यात यश मिळवलं. या निकालामुळे आठ फेऱ्यांनंतर दिव्या चार गुणांसह गुणतालिकेत गुकेशच्या अर्धा गुण पुढे आहे. इतर निकालांमध्ये विदित गुजराती आणि वैशाली रमेशबाबूला पराभवाचा सामना करावा लागला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**